आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

८ जुलै २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- मुंबईत एकात्मिक पूरनियंत्रणासाठी १३ हजार कोटी रुपयांचा आराखडा केंद्राला सादर केल्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत निवेदन

- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक विधान परिषदेत मंजूर

- पिंपरी चिंचवडमध्ये कचऱ्याचा डोंगर इमारतीवर कोसळला, ढिगाऱ्याखाली १६ जण अडकले असल्याची भीती

- अमेरिका आणि इराणनं युद्धबंदी मोडल्यानं मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार ६७७ अंकांची घसरण

**आणि**

- पालघर, रायगड, नाशिक, पुणे आणि साताऱ्यातल्या घाट भागाला उद्या सकाळपर्यंत मुसळधार पावसाचा रेड अलर्ट

<><><><><>

मुंबईमध्ये एकात्मिक पूरनियंत्रणासाठी १३ हजार कोटी रुपयांचा आराखडा राज्य सरकारनं केंद्राला सादर केला असून त्याद्वारे मुंबईत ३७० हॉटस्पॉट्स ठरवले आहेत. पाऊस आणि भरती एकाच वेळी असताना या ठिकाणांवर साचणारं पाणी अर्ध्या तासात बाहेर कसं काढता येईल, यावर या आराखड्यात भर दिला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. राज्यात पावसामुळे झालेल्या हानीबाबत त्यांनी आज निवेदन दिलं. मिसिंग लिंकजवळ दरड कोसळल्याप्रकरणी, इथली सुरक्षाव्यवस्था आणखी भक्कम कशी करता येईल, याबाबत आआयटी मुंबईच्या तज्ज्ञांकडून शिफारशी मागवल्या आहेत, असंही ते म्हणाले.

मुंबई शहराला होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी गारगाई धरण येत्या ३ वर्षांत पूर्ण करायचं आश्वासन त्यांनी दिलं. मुंबई खड्डेमुक्त करणं, तसंच वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सुरू असलेल्या विविध कामांची माहिती त्यांनी दिली.

<><><><><><>

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, महाराष्ट्र सुधारणा विधेयक आज विधान परिषदेत संमत झालं. या विधेयकामुळे कुठल्याही नागरिकावर अन्याय होणार नाही याची ग्वाही देत संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठवण्याची गरज नसल्याचं गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्ट केलं. विधेयकातल्या तरतुदींना विरोध करत विरोधकांनी हे विधेयक मंजूर करताना सभात्याग केला.

डिजिटल माध्यमातून देशाच्या आणि राज्याच्या विरोधात मतप्रदर्शन करणाऱ्या साहित्यावर बंदी आणण्याची तरतूद या विधेयकात आहे, असं कदम यांनी आज सांगितलं. आतापर्यंत छापील स्वरूपात असलेल्या साहित्यावर बंदी घालता येत होती, असं त्यांनी स्पष्ट केलं होतं. याशिवाय गुन्हा करू शकतो अशी शक्यता असलेल्या व्यक्तींना प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून २४ तासाऐवजी १५ दिवस ते १ महिना कालावधीसाठी ताब्यात घेण्याची तरतूद यात आहे. त्यासाठी न्यायालयाची परवानगी आवश्यक असेल असं त्यांनी स्पष्ट केलं. भारतीय दंड संहितेत अशा प्रकारची तरतूद होती, मात्र भारतीय नागरिक सुरक्षा संहितेत ही तरतूद नसल्यानं या विधेयकात ही तरतूद केल्याचे गृह राज्यमंत्री म्हणाले.

मुंबईत जेजे आणि केईएम रुग्णालयात २-३ महिन्यात मशीनद्वारे, चिरफाड न करता शवविच्छेदन प्रक्रिया सुरू होईल. ही प्रक्रिया यशस्वी झाली तर राज्यात सर्वत्र मशीनच्या माध्यमातून शवविच्छेदन सुरू करू अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली.

<><><><><><><>

राज्यातल्या समृद्ध लोककला परंपरेचं जतन, संवर्धन आणि प्रसार करण्यासाठी राज्य शासनाने लोककला अनुदान पॅकेजचा विस्तार करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय

घेतला आहे. यापुढे ‘नमन खेळे’, ‘जाखडी’, ‘वहीगायन’ आणि ‘झाडीपट्टी रंगभूमी’ या चार पारंपरिक लोककलांचा, लोककला अनुदान योजनेत समावेश करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत केली. या योजनेअंतर्गत प्रत्येक लोककला प्रकारातल्या २० कलापथकांना प्रत्येकी ५० हजार रुपये याप्रमाणे १० लाख रुपये वार्षिक अनुदान देण्यात येणार आहे.

<><><><><>

आळंदीमध्ये ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचं आज पंढरपूरकडे प्रस्थान झालं. गेल्या चार-पाच दिवसांपासून उद्भवलेल्या पूरसदृश परिस्थितीमुळे आळंदीकडे जाणारे चारही पूल अद्यापही इंद्रायणीच्या पाण्याखाली आहेत. त्यामुळे प्रस्थान सोहळा कसा होणार, याबाबत साशंकता होती. मात्र नियोजित वेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता प्रस्थान सोहळ्यातील सर्व विधींना सुरुवात झाली आणि थोड्यावेळापूर्वी पालखीनं प्रस्थान केलं.

<><><><><>

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातल्या मुक्ताईनगर इथून पंढरपूरकडे निघालेल्या **संत मुक्ताबाई पालखीचं** आज बीड जिल्ह्यातल्या गेवराई तालुक्यात आगमन झालं. बीड जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश करताच शहागड इथं गोदावरी पात्रात माऊलींच्या पादुकांना स्नान घालण्यात आलं. हा सोहळा पाहण्यासाठी गोदावरीच्या तीरावर हजारो भाविक जमले होते. आज या पालखीचा मुक्काम गेवराई मध्येच होणार असून उद्या ती बीडकडे रवाना होणार आहे.

**संतश्रेष्ठ गजानन महाराज पालखी**चंही आज बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ तालुक्यात आगमन झालं. बीड जिल्ह्याच्या वेशीवर भाविकांनी मोठ्या संख्येनं भाविकांनी श्रींच्या पालखीचं स्वागत केलं. आज या पालखीचा मुक्काम परळी इथल्या शक्तीकुंज वसाहतीत होणार आहे. उद्या सकाळी ही पालखी वैजनाथला रवाना होणार आहे.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्याच्या चिपळूण तालुक्यात मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचं काम मौजे टेरव गावात पूर्ण झालं आहे.  एसआयआर १०० टक्के पूर्ण करणारं राज्यातलं हे पहिलं गाव ठरलं आहे. गावात एकूण मतदार १९५ असून त्यात ९३ महिला आहेत.

<><><><><>

पिंपरी चिंचवडमध्ये मोशीजवळ कचऱ्याचा डोंगर एका प्रशासकीय इमारतीवर कोसळला. यात सुमारे १६ जण अडकल्याची भीती व्यक्त होते आहे. कचऱ्यावर प्रक्रीया करणाऱ्या कंपनीचं काम या इमारतीतून चालायचं. एनडीआरएफसह अन्य यंत्रणा याठिकाणी बचावकार्य राबवत आहेत. गरज पडली तर लष्कराची मदतही घेतली जाणार आहे.

<><><><><>

अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांमधला तणाव तूर्तास वाढला असून संघर्ष संपवण्यासाठी इराणबरोबर केलेला करार संपुष्टात आल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.सध्यातरी इराणशी कोणतीही चर्चा करायला आपण तयार नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे. तुर्कीयेची राजधानी अंकारा इथे नाटो राष्ट्रांच्या शिखर संमेलनादरम्यान राष्ट्राध्यक्ष ट्रम्प बातमीदारांशी बोलत होते.

<><><><><>

भू-राजकीय तणावाचा परिणाम आज भारतीय शेअर बाजारांवर दिसून आला. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज १ हजार ६७७ अंकांनी खाली आला आणि ७६ हजार ५०४ वर बंद झाला. राष्ट्रीय शेअरबाजाराचा निफ्टी ५१७ अंकांनी खाली आला आणि २३ हजार ८८२ वर बंद झाला. दिवसाच्या उत्तरार्धात इराण बरोबरचा संघर्ष संपवण्यासाठीचा करार संपुष्टात आल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केल्यानंतर बाजारात जोरदार घसरण झाली. परकीय चलन बाजारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ६० पैशांनी घसरला आणि तो ९५ रुपये ५६ पैसे या पातळीवर बंद झाला.

<><><><><>

राजधानी मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी गेले काही दिवस तांडव करणाऱ्या पावसानं आज विश्रांती घेतली. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या ७ धरणांच्या क्षेत्रात पाऊस चांगला झाल्यानं पाणीसाठा ४१ टक्के पर्यंत वाढला आहे. तुळशी आणि विहार तलाव भरुन वाहू लागले आहेत.

**पालघर** जिल्ह्यात पावसाचा जोर ओसरला असून अधून मधून सरी येत आहेत.

**नवी मुंबई** परिसरातही पाऊस कमी झाला आहे.

**रायगड** जिल्ह्यातल्या घाटमाथा परिसरात जोरदार पाऊस झाल्यानं सावित्री, अंबा, कुंडलिका, पाताळगंगा या नद्या धोक्याच्या खुणेवरुन वाहत आहेत. रोहा आणि महाड शहरात पुराचं पाणी शिरलं आहे. कर्जत तालुक्यात जामरुंग इथं आंबिवली पाझर तलाव फुटला, त्यामुळे शेकडो एकर शेतीचं नुकसान झालं.

**रत्नागिरी** जिल्ह्यात पावसाचा जोर ओसरला आहे. जून महिन्यात जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या फक्त १४ पूर्णांक ३९ शतांश टक्के पाऊस झाला होता; मात्र त्यानंतर पावसाने जोर धरल्यामुळे आजपर्यंत वार्षिक सरासरीच्या ३६ पूर्णांक २६ शतांश टक्के पावसाची नोंद झाली आहे. गेल्या वर्षी या दिवसापर्यंत ३७ पूर्णांक ३९ शतांश मिलिमीटर पाऊस झाला होता.

गेल्या काही दिवसांतल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातल्या एकूण ७१ धरणांपैकी २१हून अधिक धरणं पूर्ण क्षमतेने भरली आहेत.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात यंदा अतिवृष्टीमुळे आतापर्यंत अंदाजे ९२ लाख ७३ हजार ३३७ रुपयांचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल प्रशासनाला मिळाला आहे. २००पेक्षा जास्त घरांचं नुकसान झालं असून वीजेच्या तारा आणि खांबांची पडझड झाली आहे. वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणची यंत्रणा कार्यरत आहे.

**नाशिक** शहरासह इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ तसंच सुरगाणा परिसरात मुसळधार पाऊस सुरु आहे. नाशिक शहराच्या अनेक भागात पाणी साचलं असून काही ठिकाणी घरामध्ये पाणी शिरलं. गोदावरी नदीच्या पाणी पातळीतही वाढ झाली

आहे. वणी इथल्या सप्तश्रृंगी गडाच्या मार्गावर दरड कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्यानं हे मंदिर गुरुवारपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. नाशिक जिल्ह्याच्या घाटमाथा परिसरात आजही रेड अलर्ट देण्यात आला आहे.

<><><><><><>

हवामान विभागानं पालघर, रायगड या जिल्ह्यांना तसंच नाशिक, पुणे आणि साताऱ्यातल्या घाट परिसराला उद्या सकाळपर्यंत मुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. याठिकाणी वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस होईल, असा अंदाज आहे. याशिवाय मुंबई, ठाणे, नाशिकमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे. त्यामुळं काही ठिकाणी वादळी वारे आणि जोरदार पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><><>//**